12:21:49 नियमित दिवाणी दावा ७२/२०१८

राजाराम चंदू मगदूम वि.बाजीराव गुंडा मगदूम
नि.नं. २७/लगत / सी

**उलटतपास वादी तर्फे श्री. व्ही. बी. माने वकील यांच्यामार्फत पुन्हा शपथेवर सुरु,**

६. मी शेती करतो. माझे शिक्षण बारावी पर्यंत झालेले आहे. गट नं. ४३६ व ४३७ या दोन्ही जमिनींचे सातबारा उतारे मी पाहिलेले आहेत. (साक्षीदारास नि.३/लगतचे कागदपत्र दाखविण्यात आले.) आता मला दाखविण्यात आलेल्या नि.३/लगत सातबारा उताऱ्यावर चंदू खंडू मगदूम यांचे नाव नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ४३७ मध्ये आमचा संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ४३६ मध्ये राजाराम यांचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमची जमीन आमचे आम्ही करतो तर त्यांची जमीन त्यांचे ते करत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, हद्दीवरून वाद होते म्हणून वादी यांनी सन २०१८ मध्ये सरकारी मोजणी करून घेतली. मी या कामी वादी यांनी हजर केलेली कागदपत्रे पाहिलेली नाहीत. (साक्षीदारास नि.२४ लगत वरील कागदपत्र दाखविण्यात आले)

प्रश्न –आता तुम्हाला दाखविण्यात आलेले नि. २४ लगत कागदमधील सरकारी मोजणीच आहे ना ?

उत्तर – कागद सरकारी मोजणीचाच आहे मात्र सरकारी मोजणी रविवारची येते का ? सदरची मोजणी ही खाजगी लोकांबाबत केली जाते, कागदपत्रे सरकारी दाखवून अशी मोजणी करवून घेतली जाते.

७. हे म्हणणे खरे आहे की, सदर सन २०१८ मध्ये झालेली मोजणी रविवारी झाल्यामुळे चुकीची आहे याबाबत आम्ही तक्रार केलेली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदरबाबत आम्ही वकिलांना सांगितले होते. गट क्र. ४३७ च्या उगवत्या बाजूला आमची जमीन आहे. गणपती रामू मगदूम हे आमचे चुलत चुलते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचा हिस्सा देखील आमच्या जमीनीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, लगतचे जमीन धारक म्हणून गणपती यांना देखील मोजणीच्या नोटिसा देण्यात आलेल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ४३७ मध्ये आमचा काहीही संबंध नसताना आम्ही राजाराम यास हरकत अडथळा करू लागलो. हे म्हणणे खरे नाही की, म्हणून राजाराम यांनी आमचे विरुद्ध सदरचा दावा दाखल केला आहे.

प्रश्न – राजाराम यांनी दावा कशासाठी दाखल केला ?
उत्तर – आमचे चुलते त्यावेळी चेअरमन होते, त्यावेळी त्यांनी पाण्याचा कर भरला नव्हता, त्यावेळी चार माणसात आमचे चुलते त्यांना बोलले होते, त्याचा राग म्हणून राजाराम यांनी आमचे विरुद्ध दावा दाखल केला. बाकी कोणतेही कारण नाही.

८.रंगराव बाजीराव मगदूम हे माझे सख्ये चुलत भाऊ आहेत, बाजीराव गुंडा मगदूम हे माझे सख्ये चुलते आहेत, जयसिंग गुंडा मगदूम हे माझे वडील आहेत. हे म्हणणे खरे आहे की, या तिघांच्या विरुद्ध पन्हाळा कोर्टामध्ये रे क्रि. के नं. ५७/२०१० ही दाखल झाली होती. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, मी वर सांगितलेल्या कारणावरूनच ही केस दाखल झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर केसमध्ये या तिघांना प्रत्येकी हजार रुपये दंड झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर दंड झाल्यामुळे आम्ही वादी यांना सदर मिळकतीमध्ये हरकत अडथळा करू लागलो. हे म्हणणे खरे नाही की, वादीच्या गट नं. ४३७ मध्ये आमचा काहीही संबंध नसताना आम्ही त्यांना वरचेवर त्रास देतो. हे म्हणणे खरे नाही की,

वादी हे भांडखोर आहेत  असे मी माझ्या सरतपासात खोटे नमूद केले आहे.  हे म्हणणे खरे आहे की, माझ्या  सरतपासाच्या पानं नं. २  पॅरा २ मध्ये "तसेच वादीने सन २०१८ साली आपले गट नं. ४३७ ची सरकारी मोजणी केली असून त्यामध्ये आमचे कोठेही अतिक्रमण दिसून येत नाही." असे शब्द नमूद आहेत.  हे म्हणणे खरे नाही की,  राजकीय आकसापोटी तसेच झालेल्या केसचा राग मनात धरून आम्ही वादी यास त्रास देतो.  हे म्हणणे खरे नाही की,  मी दाव्यात खोटी कैफियत दाखल केलेली आहे.  हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दाव्यात खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करून खोटया आशयाची साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

12:45:12

श्रवणोत्तर स्वीकृत,

**सही/-**

दि.  १०/०३/२०२६.

**( के. दि. काकतकर )**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा